**नि.दि.दा. क्र.१४०००२७/२००९**
**निशाणी क्रमांक – ३९ खाली**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**<u>शपथेवर उलटतपास सुरु -</u>**
**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. ए. व्ही. गजभिये यांच्यामार्फत</u>** :-

**२७.** हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा श्रीराम खेडकर यांना दोन मुले नामे देवराव व भाऊराव व ३ मुली नामे बिजाबाई, कलावती व शांताबाई अशा होत्या. माझ्या आजीचे नाव लक्ष्मीबाई (प्रतिवादी क्र. १) असे आहे. माझे वडील देवराव हे मयत आहेत व माझे काका भाऊराव हे जिवंत आहेत. मी ज्या घरात राहतो ते वडीलोपार्जित घर आहे व त्या घराचा क्र. ३३ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा व प्रतिवादी क्र. १ हे वेगळ्या घरात राहत होते. त्याचा घर क्र. ३१ असा आहे.

**२८.** हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६८ वरील नोटीसमध्ये मी असे कथन केले होते की, घर क्र. ३१ हे माझ्या आजोबांनी प्रतिवादी क्र. १ च्या नावे खरेदी केले होते. माझ्या तीनही आत्या आज रोजी जिवंत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ६५ वरील नोटीसमध्ये असे कथन केले होते की, घर क्र. ३३ हे वडीलोपार्जित आहे व सदरचे घर हे ग्रामपंचायतीत माझ्या आजोबाच्या नावे दर्ज आहे, माझे आजोबा मरण पावले असून प्रतिवादी क्र. १ लक्ष्मीबाई ही मालक आहे.

विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**<u>उलटतपास तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-

रामटेक.
दिनांक - १२/०९/२०२५.

**(श्रीमती डी. सी. वोराणी)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
रामटेक.